Loksatta, Pune, January 3, 2012. Pp.9

## सहा हजार रुपये मासिक वेतन देण्याची होती तयारी

# आईन्स्टाईनना होता केरळ विद्यापीठाचा नोकरीचा प्रस्ताव

वृत्तसंस्था
तिरुअनंतपुरम

शैक्षणिक क्षेत्रात भारताने आपली कीर्ती सर्वदूर पसरवण्याच्या कित्येक वर्षे आधी, त्रावणकोरच्या एका छोट्याशा संस्थानाने उच्चशिक्षणाची आस धरली होती. त्यासाठी येथील विद्यापीठाच्या कुलगुरूपदी महान शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईन यांची नियुक्ती करण्याची तयारी विद्यापीठाने केली होती. त्यासाठी आईन्स्टाईन यांना सहा हजार रुपये मासिक वेतन देण्याची तयारी दाखविली होती.

भौतिकशास्त्रात नोबेल मिळविणारे आईन्स्टाईन हे आधुनिक भौतिकशास्त्राचे जनक मानले जातात. त्यांच्या सापेक्षवादाच्या सिद्धांताने भौतिकशास्त्रात नव्या समीकरणांचा उदय झाला.या आईन्स्टाईन यांनी



त्रावणकोर येथून आलेले कुलगुरूपदाचे निमंत्रण नम्रपणे नाकारले.अमेरिकेतील प्रिन्स्टन विद्यापीठाचे निमंत्रण स्वीकारून आपण तेथे नोकरीसाठी जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते..

त्रावणकोर विद्यापीठाची स्थापना १९३७ साली झाली. पुढे केरळ विद्यापीठ असे त्याचे नामकरण झाले. विद्यापीठाचे यंदा अमृतमहोत्सवी वर्ष असून त्यानिमित्त अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दिवंगत प्राध्यापक ए.श्रीधर मेनन यांनी विद्यापीठाच्या गौरवशाली इतिहासावर पुस्तक लिहिले आहे. त्यातील संदर्भानुसार, आईन्स्टाईन यांना विद्यापीठाच्या कुलगुरूपदी विराजमान करण्याची शिफारस त्रावणकोरचे तत्कालीन दीवाण सर सी.पी.रामस्वामी अय्यर यांची होती.अय्यर हे एकअष्टपैलू बहुआयामी व्यक्तिमत्व होते.

स्थानिक दस्तावेजांचा दाखला मेनन यांनी दिला आहे.अय्यर यांनी त्रावणकोरचे शेवटचे महाराजा, राजपुत्र चित्तिरा तिरूनल बलराम वर्मा यांना आइन्स्टाईन बाबतची शिफारस केली होती.विद्यापीठाचे मानाचे पद आईन्स्टाईन यांनी भूषवावे, ही अय्यर यांचीच संकल्पना होती.जर जगविख्यात आईन्स्टाईन यांचे नाव विद्यापीठाशी जोडले गेले तर विद्यापीठाच्या कीर्ती आणखी वाढेल,असा त्यांचा उद्देश होता.

लेखक व इतिहासतज्ज्ञ एम.जी.शशिभूषण सीपी यांच्यानुसार, अय्यर यांनी आईन्स्टाईन यांच्याप्रमाणे अनेक बुद्धिवंतांना विद्यापीठात अध्यापनासाठी आणावे, यासाठी प्रयत्न केले होते.